कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयः, (रामटेक) महाराष्ट्रम्

रामटेक कार्यालय–प्रशासकीय भवन, मौदारोड, रामटेक– 441106, जि.नागपूर

नागपूर कार्यालय–शैक्षणिक परिसर, पाचवा माळा, ना.सु.प्र. संकुल, मोरभवनजवळ, नागपूर–12.

Ramtek: Ph. 07114-256476, Fax. 255549 Nagpur: Ph. 0712-2248094

पत्र क्र. ककासंवि/व्हीसीओ/ज.सं./2019/34 **दि. : 27/03/2019**

पं. वसंत गाडगीळ, डॉ. लीना रस्तोगी व प्रो. वसंतकुमार भट्ट यांना ''महाकवी कालिदास संस्कृत–व्रती राष्ट्रीय पुरस्कार'' प्रदान करण्यात येणार

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाद्वारे दरवर्षी पं. रामनारायण शर्मा वैद्य यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पं. रामनारायण शर्मा आयुर्वेद संशोधन प्रतिष्ठान, स्थानिक जिल्हा प्रशासन आणि महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ''**महाकवी कालिदास संस्कृत–व्रती राष्ट्रीय पुरस्कार**'' प्रदान केला जातो. हा **महाकवी कालिदास संस्कृत–व्रती राष्ट्रीय पुरस्कार समारोह शुक्रवार, दि. 29 मार्च 2019 रोजी दुपारी 3.00 वाजता सायंटिफिक सभागृह, लक्ष्मीनगर येथे आयोजित करण्यात आला आहे.**

कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी यांच्या आध्यक्षतेखाली संपन्न होणा–या या पुरस्कार सोहळयाला **प्रमुख अतिथी** या नात्याने विश्वेश्वरय्या प्रौद्योगिकी राष्ट्रीय संस्थान, नागपूरचे अध्यक्ष, प्रख्यात उद्योजक आणि संस्कृतप्रेमी **श्री. विश्रामजी जामदार** उपस्थित राहणार आहेत. बैद्यनाथ प्रतिष्ठानचे व्यवस्थापकीय संचालक **श्री. सुरेश शर्मा,** नागपूरचे जिल्हाधिकारी **श्री. अश्विन मुद्गल**, महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक **श्री. प्रशांत सवाई,** संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकायाच्या अधिष्ठाता **प्रो. नंदा पुरी,** कुलसचिव **डॉ. रामचंद्र जोशी** विशेषत्वाने उपस्थित राहतील.

ज्या विद्वज्जनांनी संस्कृत भाषेच्या प्रचार, प्रसार, विकास तसेच संशोधनासाठी आयुष्यभर सेवा केली त्यांचा यथोचित गौरव व्हावा हा प्रस्तुत पुरस्कार प्रदान करण्यामागचा उद्देश आहे. समाजात संस्कृत भाषेला गौरवयुक्त स्थान मिळवून देण्यात ज्यांनी अमूल्य योगदान प्रदान केले अशा महान विभूतींना महाकवी कालिदास संस्कृत–व्रती पुरस्कार विश्वविद्यालयाकडून दिला जातो.

सन 2017 करिता प्रख्यात संस्कृत पंडित व पुण्याहून प्रसिद्ध होणा–या 'शारदा' संस्कृत पाक्षिकाचे संपादक पं. वसंत गाडगीळ आणि 2018 करिता संस्कृत विद्वान प्रो. वसंतकुमार भट्ट, निवृत्त संस्कृत विभागाध्यक्ष, गुजरात विद्यापीठ, अहमदाबाद आणि नागपुरातील प्रख्यात संस्कृत विदुषी आणि संस्कृत भाषा प्रचारिणीच्या अध्यक्षा डॉ. लीना

रस्तोगी यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. तसेच विश्वविद्यालयातर्फे आयोजित नाटयस्पर्धेचे पारितोषिक वितरण देखील या कार्यक्रमात होणार आहे.

पुरस्कारप्राप्त विद्वानांचा संक्षिप्त परिचय –

पं. वसंत गाडगीळ हे महाराष्ट्रातील प्रख्यात वेदविद्या पंडित आहेत. महाराष्ट्रातील सर्वात जुने आणि आजही उत्तमरीत्या सुरू असलेले संस्कृत भाषेतून प्रकाशित होणा–या ''शारदा'' पाक्षिकाचे ते संपादक आहेत. यावर्षी हे पाक्षिक हीरक महोत्सव साजरा करीत आहे. याशिवाय देश–विदेशात निरंतर व्याख्यानांसाठी त्यांना निमंत्रित केले जाते. संस्कृत पत्रकारितेचा व वेदविद्येचा वसा निष्ठेने चालविणा–या पंडितांमध्ये श्री. गाडगीळ हे अग्रेसर आहेत.

प्रो. वसंतकुमार भट्ट हे साहित्य व्याकरण आणि हस्तलिखिशास्त्राचे विद्वान आचार्य आहेत. गुजरात विद्यापीठात भाषाविभागाचे संचालकपद तसेच संस्कृत विभागाध्यक्ष पद त्यांनी भूषविले आहे. अभिज्ञानशाकुन्तल या कालिदासविरचित नाटकाची पाठचिकित्सा आवृत्तीचे महद्कार्य भट्ट यांनी केले आहे. राष्ट्रपती सन्मानासह अनेक मानसन्मान त्यांना प्राप्त झाले असून त्यांची 42 पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

डॉ. लीना रस्तोगी या उमरेड येथील नूतन आदर्श कला महाविद्यालयातून संस्कृत विभाग प्रमुख म्हणून निवृत्त झाल्या आहेत. सांप्रत त्या संस्कृत भाषा प्रचारिणी सभेच्या अध्यक्षा आहेत. संस्कृत भवितव्यम् या नागपुरातून प्रकाशित होणा–या साप्ताहिकाच्या पूर्वसंपादिका आहेत. संस्कृत विदुषी आणि संस्कृत कवयित्री म्हणून त्या महाराष्ट्रातच नव्हे तर भारतभरात प्रख्यात आहेत. महाराष्ट्र शासनाचा महाकवी कालिदास संस्कृत साधना पुरस्काराने त्यांचा यापूर्वी गौरव झाला आहे. त्यांचे 17 ग्रंथ प्रकाशित झाले असून 10 प्रकाशनाधीन आहेत. तसेच अनेक संस्कृत एकांकिकांची रचना त्यांनी केली आहे.

या सर्व विद्वद्जनांच्या संस्कृतसेवेचा सन्मान प्रस्तुत पुरस्काराने करण्यात येणार आहे. या सोहळयाला संस्कृत विद्वान्, अभ्यासक, संस्कृतानुरागींनी उपस्थित राहावे असे आवाहन **कुलसचिव डॉ. रामचंद्र जोशी आणि समन्वयिका प्रो. कविता होले** यांनी केले आहे.

स्वा/–

जनसंपर्क अधिकारी